जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर- 20/20
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः-   13.03.2020

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. धबाले दिक्षा कपिल,** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 19.03.2020 रोजी सकाळी 10.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बालकल्याण समितीच्या खालील (11) सदस्यांची मुदत दिनांक 14.02.2020 रोजी संपली असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील सुधारीत कलम 31(अ) मधील तरतुदीनुसार व महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज नियम 4-ब नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व माहिला व बालकलयाण समितीवर नविन नामनिर्देशनाव्दारे 11 (अकरा) सदस्यांची नियुक्ती (स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती केलेल्या सदस्यांप्रमाणे) पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शिक्षण व महिला व बालकल्याण समितीवर नियुक्ती करणे बाबत.

1) भारतीय राष्ट्रय काँग्रेस चे तौलनीक संख्यानुसार 10 सदस्य
2) भारतीय जनता पार्टीचे तौलनीक संख्यानुसार 01 सदस्य

1- मुळे कविता संतोष, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
2- बिरकले सरिता बालाजीराव, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
3- नेरलकर अपर्णा ऋषीकेश, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
4- पाटील संगिता विठ्ठल, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
5- खान सलीमा बेगम नुरुल्ला खान, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
6- पवार जयश्री परमेश्वर, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
7- अरशीन कौसर मोहम्मद हबीब, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
8- कापुरे गितांजली रामदास, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
9- खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
10- गायकवाड चित्रा सिध्दार्थ, **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**
11- गोरे शांता संभाजी, **भारतीय जनता पार्टी**

**विषय क्रं. 02**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 चे पोटकलम (2) (ब) व शासन अधिसुचना दिनांक 28 फेब्रुवारी 2012 नुसार भारतीय राष्ट्रीय काँग्रस चे नामनिर्देशित सदस्य म्हणुन 05 सदस्य येत असल्यामुळे सभागृहनेता श्री स. विरेंद्रसिंघ गाडीवाले यांना तौलनीक संख्याबळ विचारात घेवुन त्यांचे पक्षाच्या वतीने खालील व्यक्तीची नामनिर्देशित सदस्य म्हणुन

नेमणुक करण्याची शिफारस केलेली आहे. करिता शासनाने ठरवुन दिलेल्या अर्हतेनुसार प्राप्त ठरलेल्या खालील व्यक्तीची नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी नामनिर्देशित सदस्य म्हणुन सार्वत्रिक निवडणुक-2017 नंतरच्या शिल्लक असलेल्या कालावधी पर्यंत नेमणुक करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे सदरचा प्रस्ताव येत्या मनपा सर्वसाधारण सभेत निर्णयास्तव ठेवण्यात यावा.

| अ.क्र. | नामनिर्देशित व्यक्तीचे नांव | प्रभाग क्रं. | मतदार यादीतील क्रमांक |
|---|---|---|---|
| 01 | श्री पापंटवार संजय बापुराव | 05 | मतदार यादीतील अनुक्रमांक 333 |
| 02 | श्री जाधव बालाजी विठ्ठलराव | 15 | मतदार यादीतील अनुक्रमांक 777 |
| 03 | श्री सोनकांबळे संदिप रोहिदास | 08 | मतदार यादीतील अनुक्रमांक 9266 |
| 04 | मंगल रविंद्र धुळेकर | 10 | मतदार यादीतील अनुक्रमांक 122 |
| 05 | श्री मुन्तजीबोद्दीन मुनिरोद्दीन | 07 | मतदार यादीतील अनुक्रमांक 5491 |

**विषय क्रं. 03**

कार्यालयीन आदेश क्रं. लेवि/11242/20 दि. 06.01.20 अन्वये शासन निर्णय दिनांक 04.01.20 नुसार दिनांक 01 जुलै 19 पासुन 7वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनसंरचनेतील मुळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्याचा दर 12 टक्के करण्यात यावा सदर महागाई भत्ता वाढ दिनांक 01 डिसेंबर 19 पासुन रोखीने देण्यात यावी व दिनांक 01 जुलै 19 ते 30 नोव्हेंबर 19 या पाच महिण्याच्या कालावधीतील थकबाकी बाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असे शासन निर्णयात नमुद आहे.

शासनाने शासकीय कर्मचा-यांना महागाई भत्यात वाढ केल्यानंतर शासन निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांनाही सुधारीत दराने महागाई भत्ता लागु करण्यात येवुन त्यास कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठराव क्रं. 26 दि. 28.05.02 अन्वये ठेवण्याचे निर्देश्ि ात केल्यानुसार महानगरपालिकेतील प्रतिनियुक्ती अधिकारी वेतनधानकांना दि. 01 डिसेंबर 19 पासुन मुळ वेतन यावर 17 टक्के दराने महागाई भत्ता लागू करण्याची प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात येते त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्रं. 04**

कार्यालयीन आदेश क्रं. लेवि/11243/20 दि. 06.01.20 अन्वये शासन निर्णय दिनांक 04.01.20 नुसार राज्य शासकिय कर्मचारी व महागाई भत्ता अनुज्ञेय असणारे इतर सर्व पात्र पूर्णकालीक कम्रचारी अद्यापही असुधारीत (सहावा वेतनप आयोगानुसार) वेतनरेणीत घेत आहेत त्यांच्या असुधारीत वेतनश्रेणीतील मुळ वेतनावरील (वेतन बँड मधील अतधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्याची दर दि 01 जुलै 19 पासुन 154 टक्के वरुन 164 टक्के करण्यात यावा सदर महागाई भत्ता वाढ दिनांक 01 डिसेंबर 19 पासुन रोखीने देण्यात यावा व 01 जुलै 19 ते 30 नोव्हेंबर 19 या 05 महिण्यांच्या कालावधीतील थकबाकी बाबत स्वतंत्रपणे आदेशीत निर्गमीत करण्यात येतील असे शासन निर्णयात नमुद आहे.

शासनाने शासकीय कर्मचा-यांना महागाई भत्यात वाढ केल्यानंतर शासन निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनाही सुधारीत दराने महागाई भत्ता लागु करण्यात येवुन त्यास कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठराव क्रं. 26 दि. 28.05.02 अन्वये ठेवण्याचे निर्देशित केल्यानुसार महानगरपालिकेतील कार्यरत वेतनधारकांना दि. 01 डिसेंबर 19 पासुन मुळ वेतन व ग्रेडवेतन यावर 164 टक्के दराने महागाई भत्ता लागु करण्याची प्रशासकिय व आथीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात येते त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्रं. 05**

कार्यालयीन आदेश क्रं. लेवि/सेनि/11573/20 दिनांक 13.01.20 अन्वये शासन निर्णय दिनांक 07.01.20 नुसार असुधारीत वेतनश्रेणीत (सहाव्या वेतन आयोगानुसार) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील निवृत्तीवेतनधारक / कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावर दिनांक 01 डिसेंबर 20 पासुन अनुज्ञेय महागाई वाढीचा दर 154% वरुन 164% करण्यात येत आहे सदर महागाई वाढीची रक्कम दिनांक 01.01.020 पासुन रोखीने अदाई करण्याची प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रकदान करण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यमा देणे बाबत. तसेच दिनांक 01 जुलै 19 ते 31 डिसेंबर 19 या 06 महिण्याचे कालावधीतील थकबाकी बाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमीम रिण्यात येतील.

**विषय क्रं. 04**

श्री सय्यद महेमुद स. करीम मनपा आस्थापनेवर लिपीक पदावर कार्यरत होते. संबंधीत कर्मचारी हे विनापरवानगी अनाधिकृतरित्या कामावर गैरहजर असल्यामुळे सेवा कालावधीत कर्तव्यात एकनिष्ठ नसल्याने मनपाकेच्या हिताचे नसल्यामुळे त्यांना दि. 20.07.13 अन्वये सक्तीने सेवानिवृत्त केले होते.

संबंधीतास सेवानिवृत्त केल्यानंतर त्यांचे दि. 15.03.14 रोजी निधन झाले आहे त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आल्यामुळे त्यांच्या जागी त्यांचा मुलगा श्री सय्यद लायख स. महेमुद याला अनुकंपा तत्वावर सेवेत घेण्याबाबत मनपाकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 93 दि 30.11.15 समंत केला होता. शासन निर्णय दि. 22.08.05 मधील तरतुदउ ीनुसार केवळ प्रशासकीय सेवेत कार्यरत असतांना दिवंगत झालेल्या गट-क गट-ड च्या कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती

अनुज्ञेय आहे लिपीक या संवर्गातील सेवानिवृत्त अथवा सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या कर्मचा-यांच्या अनुकंपा तत्वावर नेमणुक देण्याची तरतुद नाही.

त्यानुसार श्री सय्यद लायख स. महेमुद याला अनुकंपा तत्वावर सेवेत घेण्याबाबत मनपा सर्वसाधारण सभेने उक्त ठराव मनपा अधिनियमातील कलम 451 (1) नुसार विखंडीत करण्यासाठी शासन निर्णय दि. 20 मे, 2016 अन्वये निलंबीत करण्यात आला आहे. सदर ठराव क्रं. 93 दिनांक 30.11.15 हा निलंबीत करुन त्याबाबत अभिवेदन मागविण्यात आलेले होते त्याअनुषंगाने कुठल्याही प्रकारचे अभिवेदन प्राप्त झालेले नसल्याचे उपायुक्त प्रशासन मनपा यांनी त्यांच्या दि. 19.07.19 च्या पत्रान्वये शासनास कळविलेले आहे. त्यानुसार मनपाकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं 93 दिनांक 30.11.15 ठराव अंतिमतः विखंडीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक 30.08.19 अन्वये शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक 22.08.05 मधील तरतुदीनुसार केवळ प्रशासकीय सेवेत कार्यरत असतांना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड च्या कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय आहे. लिपीक या संवर्गातील सेवानिवृत्त अथवा सकत्ीने सेवानिवृत्त केलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यास अनुकंपा तत्वावर नेमणुक देण्याची तरतुद नाही. नावाशमनपा सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. 93 दि 30.11.15 हा नियमानुसार नसल्यामुहे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 451(3) नुसार अंतिमतः विखंडीत करण्यात आला **त्याची नोंद घेणे बाबत**.

**विषय क्रं. 07**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीने दिनांक 09.01.2020 रोजी ठराव क्रं. 24 खालील प्रमाणे पारीत करुन महासभेस मान्यतेसाठी शिफारस केली त्यास मान्यता देणे बाबत.**

मनपाकेची हबीबीया कॉलोनी येथील शाळेतील विद्यार्थीची संख्या जास्त असुन सदरील शाळेत फक्त 8वा वर्ग सध्या चालु आहे 8वीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी जास्त अंतर असलेल्या शाळेत वर्ग 9वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी जाणे आवश्यक आहे त्यामुळे सदरील शाळेत वर्ग 9वा व 10वा वर्ग शासनाची मान्यता घेवुन वर्ग सुरु करण्यासाठी हि पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीची सभा सर्वानुमते मनपा सर्वसाधारण सभेस शिफारस करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 08**

**नांदेड शहर मलनिःस्सारण व्यवस्थे अंतर्गत उत्तर व दक्षिण नांदेड भागातील 06 पंपिंग स्टेशन व 03 मलशुध्दीकरण कैंद्राची दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी कंत्राटदाराची नेमणुक करणे बाबत.**

जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत नांदेड शहर मलनिःस्सारण व्यवस्थे अंतर्गत नांदेड उत्तर मध्ये 05 पंपिंग स्टेशन व 02 मलशुध्दीकरण केंद्र व दक्षिण मध्ये एक पंपिंग स्टेशन व एक मलशुध्दीकरण केंद्र देखभाल दुरुस्तीची कामे चालु असून सध्या मे. पंगती कन्सट्रक्शन चाकुर यांच्याकडे देखभाल दुरुस्तीकरिता देण्यात आली आहेत. मे. पंगती कन्सट्रक्शन चाकुर या कंत्राटदाराचा कालावधी पूर्ण होत आहे त्यामुहे मे. प्रगती कन्सट्रक्शन चाकुर यांना पुढील निविदा प्रक्रिया होई पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

नांदेड शहर मलनिस्सारण व्यवस्थे अंतर्गत नविन निविदा प्रक्रिया करणेसाठी एकूणर 06 पंपिंग स्टेशन व 03 मलशुध्दीकरण केंद्र चालविण्यासाठी खालील प्रमाणे वर्ष (सन 2020-21) मध्ये पुढील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | आस्थापना खर्च | रु. 109.76 लक्ष |
| 2) | विधुत खर्च | रु. 216.00 लक्ष |
| 3) | क्लोरीन, रसासयणे व डिझेल | रु. 12.31 लक्ष |
| 4) | Disposal of Grit & Debris | रु. 05.95 लक्ष |
| 5) | Disposal of Sludge | रु. 32.01 लक्ष |
| 6) | मशीनरी देखभाल दुरुस्ती | रु. 71.60 लक्ष |
| 7) | प्रयोगशाळा रसायणे | रु. 04.20 लक्ष |
| | एकूण | रु. 451.84 लक्ष प्रती वर्ष |

वर्षात वाढीव पाणी पुरवठा व त्यामुहे वाढीव मलप्रवाह तसेच नैसर्गीक दरवाढ पाहता सन 2020-21 मध्ये वार्षीक O&M खर्च MJP SSR 2019-20 अन्वये काढण्यात आला असता रुपये 234.84 लक्ष अपेक्षित आहे. पाच वर्षाकरिता रु. 1179.20 लक्ष अपेक्षीत आहे सदरील खर्च शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी 14व्या वित्त आयोगाच्या दिनांक 02 मार्च 2017 च्या निर्णयानुसार राज्य व केंद्र शासन स्तरावरील पायाभुत सुविधा पाणी पुरवठा / भुयादी गटार व्यवस्थापन ई. 14व्या वित्त आयोगातील अनुदानातुन प्राधान्याने वापर करता येईल किंवा निधी प्राप्त न झाल्यास मनपा निधीतुन खर्च करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात यावी.

मलनिस्ससारण पंपिंग स्टेशन व मलशुध्दीकरण केंद्र तज्ञ मार्गदर्शनाखाली व तज्ञ कर्मचा-यांकडून नियमीत वेळेवर चालविणे अनिवार्य आहे. अन्यथा संपूर्ण पंपिंग व प्रक्रिया व्यवस्था कोलमडून शहरात मोठी अडचण निर्माण होऊ शकते.

महापालिकेने स्वत O&M चालविण्याचे ठरविल्यास प्रथमत: 80 ते 100 वरिष्ठ ते कनिष्ठ श्रेणीची कायमस्वरुपी पदे भरावी लागतील भरतीमुळे महापालिकेवर आवर्ती व कायमचा बोजा पडेल. तसेच यापुर्वी 02 योजना (1971 ची NRAP) या अनुभव पाहता सर्व पंपिंग स्टेशन व तीन मलशुध्दीकरण केंद्र वार्षीक करारावर चालविण्यासाठी तज्ञ व अनुभवी कंत्राटदार नेमणे योग्य राहील. नाशिक, पिंपरी चिंचवड, पूणे महापालिकेच्या अशा व्यवस्था कंत्राटदार नेमूण चालविण्यात येत असुन त्या उत्तम प्रकारे चालु आहेत. खाजगी यंत्रणेकडे अद्यावत तंत्रज्ञान व मनुष्यबळ असल्याने मलनिस्सासरण सारख्या व्यवस्था त्यांच्या मार्फत चालविण्यात महापालिकेसाठी सोईचे ठरेल कंत्राटदार ठरवितांना प्रत्यक्ष विधुत देयक महापालिकेने भरावे तसेच प्रक्रिया केलेल्या मलप्रवाहाच्या Recycling व Reuse साठी महापालिकेस कांही उत्पन्न रॉयल्टीच्या स्वरुपात मिळण्यासाठी अटी ठेवल्यास O&M खर्चाचा महापालिकेवरील भार कमी होईल.

या करिता पुढील पाच वर्षासाठी नांदेड शहर मलनिस्सारण व्यवस्थे अंतर्गत 06 पंपिंग स्टेशन व 03 मलशुध्दीकरण केंद्र देखभाल दुरुस्ती व परिक्षण O&M करणेसाठी निविदा प्रक्रियेव्दारे कंत्राटदार नेमण्याची मान्यता प्रदान करण्यासाठी प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 09**

**विषय** :- जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा यांचे पाणी नमुने तपासणी / रसायण तपासणीचे सालसन 2016-17 व 2017-18 चे देयक अदाई करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाचे पाणी नमुने तपासणी व रसायणे तपासणी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नांदेड यांच्या मार्फत केले जातात. त्यासाठी सालसन 2016-17 व 2017-18 या दोन वर्षाचे शुल्क रुपये 08,07,900/- (अक्षरी रुपये आठ लक्ष सात हजार नऊशे फक्त) कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा नांदेड यांनी पत्र क्रं. जिआप्रशा नांदेड/वार्षीक तपासणी शुल्क/4075/2018 दिनांक 29.10.18 अन्वये अदाई करण्यासाठी देयक हापालिकेकडे सादर केले आहे.

करिता सालसन 2016-17 व 2017-18 या दोन वर्षाचे शुल्क रुपये 08,07,900/- अदा करण्याकरिता प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्राप्त करणेसाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>**

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

महाराष्ट्र शासना मार्फत 14व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन व भविष्यात येणा-या 15व्या वित्त आयोगाच्या निधीतुन 50% निधी घनकचरा व्यवस्थापनावर 50% प्रभागातील आत्यावश्यक सेवा जसे पाणीपुरवठा व मलनिस्सारणच्या कामावर खर्च करण्यासाठी हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचकः**- स. शेर अली महेबुब अली **अनुमोदक :-** फारुख अली खाँ, अ. शमीम अब्दुल्ला साब, फरहत सुलताना, रजिया बेगम बाबु खान, मसुद अहेमद खान, अ. हफीज अ. करीम, भानुसिंह रावत, दुष्यंत सोनाळे, ज्योत्सना गोडबोले, गितांजली हाटकर, अ. रशीद अ. गणी, शमीम बेगम, सय्यद शोएब, श्रीमती प्रभाबाई यादव, शबाना बेगम मो. नासेर, अ.लतीफ अ.मजीद, अ.अलीम खाँ, राजु यन्नम, आयेशा शेख असलम, तिडके प्रशांत, श्रीनिवास जाधव

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक प्रभागात रुपये 05.00 लक्ष चे AMRC मध्ये निविदा मागविण्यात आली होती जवळ पास निविदा मागवुन 03 महिणे पेक्षा जास्त कालावधी झाला असुन अद्याप कंत्राटदारास कार्यारंभ देण्यात आले नाही त्याबाबतची लेखी सविस्तर माहिती मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- सय्यद शेर अली **अनुमोदक :-** शबाना बेगम मो. नासेर

**विषय क्रं. 12** **प्रस्ताव**

शासनाची एकात्मिक उर्जा विकास (IPDS) योजना ही आधुनिक युगाच्या दिशेने उर्जा विभागात नवि क्रांती आहे या योजनेचे आम्ही स्वागत करतो. पण या योजने अंतर्गत आमच्या शहरात भ्रष्ट मार्गाने काम होत असल्याने भविष्यात नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत 48 कि.मी. भागात 11 के.व्ही. भुमिगत विज वाहिनी टाकण्याचे काम कार्यकारी अभियंता विज वितरण कंपनी (शहर) विभाग नांदेड यांचे स्तरावर ठरले आहे. तसा कार अधिक्षक अभियंता O&M विज वितरण आणि मनपा यांच्यासोबत 08.08.18 रोजी झाला आहे 33 लाख रुपये घेऊन त्यांना परवानगी देण्यात आली. तांत्रिकदृष्टया जिकरीच्या कामात अनियमीतता आणि गैरव्यवहार होत असल्यामुळे शासनाच्या चांगल्या विकासभिमुख योजनेला भ्रष्टाचाराने ग्रासले आहे. उक्त कामा बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिकारी प्रकरण-14 रस्ते कलम 239 व 241 नुसार कार्यवाही करुन विज वितरण विभागाकडे रस्ते दुरुसती मावेजा प्रस्ताव पाठवुन वसुल करण्यात यावे तसेच तज्ज्ञांकडून थर्ड पार्टी

ऑडिट करुन बेकायदा झालेल्या कामा बाबत कायदेशीर कार्यवाहीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात यावी. मनपा हद्यीतील 24 कि.मी. रस्ते म.रा. सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड यांचे कडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरु होण्यापुर्वी तात्काळ कार्यवाही अपेक्षीत आहे.

दिनांक 13.01.20 पर्यंत किती कि.मी. हद्यीत विज केबल टाकण्यात आले आहे त्याची लांबी रुंदी आणि खोलीचे मोजमाप किती घेतले विज केबलच्या सुरक्षेसाठी कोणते मटेरियल वापरले आहे फोडलेले रस्ते किती कि.मी. चे तयार करुन दिले आहेत परवानगी 48 कि.मी. ची असतांना अधिक काम केले आहे का ?

काम करणा-या एजन्सीला अर्थत ठेकेदाराला खोदलेले रस्ते पुनश्च दुरुस्त, रेस्टोरेशन करण्याच्या कामाचे किती कि.मी. चे लांबीचे देयके दिनांक 13.01.20 पर्यंत दिली आहे ती माहिती प्राप्त करुन घ्यावी त्यामुळे अनेक गैरव्यवहार उघड होतील मनपाकेच्या 38 कोटी रुपयांचा प्रस्ताव नामंजुर करुन विज वितरणने स्वत: काम करुन देण्याचे ठरविले होते पण वरील तारखे पर्यंत रस्ते दुरुस्त केले नाहीत यासोबतच शहरात भुमिगत विज वाहिनी व्दारे कुठे कुठे विधुत पुरवठा सुरु झाला आहे त्या स्थळांचे चाचणी अहवाल, गुणवत्ता आणि पुर्णत्व प्रमाणपत्र तसेच विधंत खांब आणि लोंबकाळणारे तार काढल्याचे लेखी पत्र घ्यावे. कारण गुरु-ता-गद्दी विकास कामाच्या वेळी असे काम अयशस्वी झाले होते अशी माहिती मनपाकडे आहे. सुरु असलेल्या कामाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे मनपा अभियंत्यांच्या देखरेखखाली काम करणे, पावसाळयात 07 जुन नंतर काम बंद ठेऊन पुढील परवानगी घेऊन काम करणे या संबंधी तविज वितरण विभागाला तोंडी सुचना दिल्या व लेखी पत्रव्यवहार केला पण याकडे दुर्लघ करुन त्यांनी रात्रीच्या वेळी मशीनने खोदकाम करुन घाईघाटने विज केबल टाकून मातीने बुजवुन घेतले शहरात अनेक भागात असे नियमबाहय काम होऊन अनियमीतता आणि गैरव्यवहार झाला असल्याने मनपासाठी उपरोक्त प्रकरणात कार्यवाही करिता माहितीची गरज आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने ती नागरिकांसाठी उत्तरदायी आहे भविष्यात जर या कामामळे दुर्घटना होऊन जिवीत किंवा वित्तहानी झाली तर ती जबाबदारी कुणाची असा प्रश्न निर्माण होणार आहे.

मनपाकेच्या दिनांक 09 ऑगस्ट 19 च्या सर्वसाधारण सभेत स. नगरसेवकांनी या विषयावर गंभीर चर्चा झाली होती तशी माहिती मनपा प्रशासनाने विज वितरणला दिली आहे तरी पण विज वितरण विभागाचे अभियंता यांच्यात सुधारणा झाली नाही. जेवढी परवानगी दिली ते रस्ते दुरुसती केलेच नाहीत उलट विनापरवानगी नियमाचे उल्लंघन करुन अधिक रस्ते खोदले आहेत मनपाकडे माहिती आल्यावर त्याची व्याप्ती समजून येईल, यामुहे प्रकरणाची बाजु तपासुन उपरोक्त विभागाकडे मावेजा प्रस्ताव पाठवुन वसुली करणे सोपे होईल व कायेशीर कार्यवाही करणे शक्य होईल.

करिता ही मनपा सर्वसाधारण सभा या प्रस्तावात नमुद सर्व प्रकारची माहिती वीज वितरण विभागाकडून घ्यावी अशी सुचना देते त्यात चुक आढळुन आल्यास उचित कार्यवाही करणे संबंधीत शासनाकडे पाठपुरावा करण्यास व कायदेशीर मार्गदर्शन घेऊन आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यास मंजुरी देत आहे हा प्रस्ताव याच सभेत सर्वानुमते समंत करण्यात येतो.

**सुचक** :- बापुराव गजभारे **अनुमोदक** :- महेंद्र पिंपळे

**विषय क्रं. 13** **प्रस्ताव**

श्री राजु मुंजाजी कांबळे पुरुष मजुर (प्र. वसुली लिपीक) हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील क्षेत्रीय कार्यालय क्रं. 3 इतवारा येथे कार्यरत असतांना मालमत्ता कराची वसुल केलेली रक्कम तात्पुरता अपहार केल्याचे कारणाने संबंधीतांनी सदरची रक्कम तीन टप्प्यामध्ये महानगरपालिका फंडात जमा केलेली असतना त्यांना प्रशासनाने कोणतीही नोटीस न देता अचानकपणे निलंबित केले. निलंबन प्रकरणी त्यांचे विरुध्द लावण्यात आलेले दोषारोप अमान्य केल्याने त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली संबंधीतांची विभागीय चौकशी करीत असतांना प्रशासनाने / चौकशी अधिकारी यांनी केवळ प्रशासनाची एकच बाजु विचारात घेवुन निर्णय दिला व दोषारोप संबंधीतां विरुध्द सिध्द होत असल्यचा अहवाल दिला. त्याअन्वये तत्कालीन आयुक्त यांनी श्री राजु मुंजाजी कांबळे पुरुष मजुर (प्र. वसुली लिपीक) यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची कोणत्याही प्रकारची वाजवी संधी न देता महानगरपालिका सेवेतुन कायमचे बडतर्फ केले आहे. परंतु प्रत्यक्षात अशा प्रकारची जबर शिक्षा देण्यासाठी प्रशासनास सक्षम प्राधिकारी म्हणून महानगरपालिका स्थायी समिती / सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तत्कालीन आयुक्त यांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता अधिकार नसतांना देखील संबंधीतांना अन्यायकारकरित्या दिनांक 04.07.14 रोजीच्या आदेशान्वये महानगरपालिका सेवेतन कायमचे बडतर्फ केले आहे.

श्री राजु मुंजाजी कांबळे यांना महानगरपालिका सेवेतुन अन्यायकारकपणे कायमचे बडतर्फ केल्यानंतर त्यांचे कुटूंबाची परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली असुन त्यांचेवर उपासमारीची वेळ आली आहे त्यामुळे संबंधीतांच्या कोटूंबीक परिस्थितीचा सहानुभुतीपुर्वीक विचार करता व त्यांनी अपहार केलेली रक्कम त्याचवेळी मनपा फंडात जमा केलेली असल्याने त्यांचेकडुन इतर कांहीही येणे नसल्याने संबंधीतांना नैसगिक न्यायानुसार सेवेची एक संधी देण्याकरिता बडतर्फीचा आदेश रदद्य करुन त्याना सेवेत पुर्ववत पुन:स्थापित करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- अब्दुल फहीम अब्दुल मुनीर **अनुमोदक** :- शमीम बेगम शेख जावीद, आयशा बेगम शेख असलम

## प्रशासकिय टिप्पणी

**श्री राजु मुंजाजी कांबळे, पुरूष मजूर (प्र.वसुली लिपीक), (निलंबीत),** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हे क्षेत्रिय कार्यालय क्रं.3 येथे प्र.वसुली लिपीक म्हणून कार्यरत असताना त्यांनी मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कराची रक्कम रु.3,05,141/- (अक्षरी रुपये तीन लक्ष पाच हजार एकशे एक्केचाळीस) वसुल करून त्या रक्कमेचा कार्यालयात भरणा न करता सदरच्या रक्कमेचा खाजगी स्वरुपात वापर केल्याचे कार्यालयाचे निर्दशनास आल्यानंतर ती रक्कम संबंधितांनी तीन टप्प्यात महापालिका फंडात भरणा केल्याचा अहवाल सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी, क्षेत्रिय कार्यालय क्रं.3 (इतवारा), मनपा नांदेड यांनी दिनांक.29.07.2013 रोजी सादर केल्यामुळे संबंधितास निलंबीत करण्यात आले.

निलंबन प्रकरणी संबंधीतांविरूध्द ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 बजावण्यात येऊन त्याबाबत खुलासा मागविण्यात आला असता, संबंधितांनी खुलासा सादर केला असुन त्याद्वारे त्यांच्याविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप संबंधितांनी अमान्य केल्यामुळे संबंधितांविरूध्द विभागीय चौकशी करणेसाठी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली.

चौकशी अधिकारी यांनी संबंधितांविरूध्द ठेवण्यात आलेल्या खालील दोषारोपांची चौकशी केली आहे.

<u>संबंधितांवर ठेवण्यात आलेले दोषारोप खालील प्रमाणे आहे</u> :-

a) सालसन 2008-09 ते 2013-14 या आर्थिक वर्षाचे वसुलीसाठी लागणारे अभिलेखे कार्यालयात न ठेवणे.
b) शासकीय रक्कमेचा अपहार करणे.
c) मालमत्ता धारकांकडून सालसन 2011 मध्ये मालमत्ता कराची रक्कम वसुल करून सदरची रक्कम ही कार्यालयात सालसन 2013 या वर्षामध्ये भरणे.
d) कर निरीक्षक यांना वसुलीसाठी लागणारे अभिलेखे तपासणीसाठी न देणे.
e) सालसन 2012-13 हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर पावतीपुस्तिकेतील न वापरण्यात आलेल्या पावत्या रद्द न करता त्या पावत्या चालु वर्षात वापरुन वसुल केलेली रक्कम कार्यालयात न भरणे.
f) सालसन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये नविन पावती पुस्तक घेवून त्या पावती पुस्तिकेमध्ये मालमत्ता कराची रक्कम वसुल करुन सदरील रक्कम कार्यालयात न भरणे.
g) कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित न राहणे.
h) मालमत्ता धारकांकडून वसुल केलेली मालमत्ता कराची रक्कम दिर्घकाळ वापरुन सदरची रक्कम कार्यालयात न भरणे.

चौकशी अधिकारी यांनी अपचारी कर्मचा-यांविरूध्द ठेवण्यात आलेल्या वरील सर्व दोषारोपांची चौकशी केली असून अंतिम चौकशी अहवाल सादर केला आहे, त्यानुसार अपचारी कर्मचा-याविरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांपैकी दोषारोप क्र.1,3 व 4, 5, 6, 7 व 8 हे सिध्द होत असून दोषारोप क्र.2 हा शासकीय रक्कमेचा तात्पुरता अपहार झालेला आहे व अपहारीत रक्कम रु.3,05,141/- (अक्षरी रुपये तीन लक्ष पाच हजार एकशे एक्केचाळीस) ही संबंधितांनी चा.क्रं.1 द्वारे दि.08.07.2013 रोजी रु.1,50,384/-(अक्षरी रुपये एक लक्ष पन्नास हजार तिनशे चौ-याऐंशी ) एवढी रक्कम व चालान क्रं.2 द्वारे दि.09.07.2013 रोजी रु.1,24,070/- (अक्षरी रुपये एक लक्ष चोविस हजार सत्तर) त्यानंतर दि.15.07.2013 चालान द्वारे रु.1877/- (अक्षरी रुपये एक हजार आठशे सत्त्यातर) अशी महापालिका फंडात उशिराने जमा केली आहे, असा अहवाल दिला असुन दोषारोप क्रं. 2, 3 व 8 हे एकाच प्रकारात मोडणारे आहेत म्हणजे पैसे वसुल करुन विलंबाने भरणे व शासकीय पैशाचा तात्पुरता अपहार केल्याचे सिध्द झाले असल्याचा अहवाल दिला आहे.

याशिवाय संबंधितांकडून पुढीलप्रमाणे 22 पावती पुस्तके कार्यालयात जमा करण्यात आलेली नसुन ती गहाळ आहेत, असेही चौकशी अहवालामध्ये नमुद आहे.

| अ.क्रं. | आर्थिक वर्ष | देण्यात आलेली पावती पुस्तकांची संख्या | उपलब्ध पावती पुस्तकांची संख्या | गहाळ पावती पुस्तकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1) | सन 2007-08 | 02 | --- | 02 |
| 2) | सन 2008-09 | 07 | 06 | 01 |
| 3) | सन 2009-10 | 08 | 05 | 03 |
| 4) | सन 2010-11 | 06 | 02 | 04 |
| 5) | सन 2011-12 | 06 | 01 | 05 |
| 6) | सन 2012-13 | 06 | --- | 06 |
| 7) | सन 2013-14 | 01 | --- | 01 |
| **एकूण** | | **36** | **14** | **22** |

करिता, उक्त सर्व बाबी विचारात घेता संबंधिताविरूध्दचे दोषारोप सिध्द झाले असून संबंधितांनी रु.3,05,141/- (अक्षरी रुपये तीन लक्ष पाच हजार एकशे एक्केचाळीस) चा तात्पुरता अपहार केल्याचे व वरील नमुद पावती पुस्तके गहाळ केल्याचे सिध्द झाल्यामुळे त्यांना यापुढे महानगरपालिका सेवेत ठेवणे महापालिकेच्या हिताचे नसल्यामुळे **श्री राजु मुंजाजी कांबळे, पुरूष मजूर** (प्र.वसुली लिपीक) (निलंबीत) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (2) (ह) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका सेवेतून त्यांच्या **पुरूष मजूर** या मुळ पदावरून पुढे नौकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल, अशा प्रकारे सेवेतून कायमचे बडतर्फ कार्यालयीन आदेश जा.क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-2/6577/14 दिनांक 04.07.2014 अन्वये त्यांना बडतर्फ करण्यात आले. व त्यांच्या विरूध्द पोलिस स्टेशन इतवारा येथे गुरन 88/2014 कलम 420,206,409 भादवी मधील गुन्हा नोंदवीला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतूका खंड (ड)च्या तरतूदीच्या अधिन ज्या कोणत्याही नगर पालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल, असा आदेश त्यास कळवल्यापासून एक महिन्याच्या आत ज्या प्राधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी तरतूद आहे. संबधितास दिनांक 04.07.2014 रोजी बडतर्फ केल्यावर जवळ जवळ 1 वर्ष 2 महिने नंतर त्यांनी स्थायी समितीकडे आपील केलेले होते. अपिलाच्या अनुषंगाने कार्या.पत्र क्रमांक नांवाशमनपा/साप्रवी/आस्था-2/9459/2015 दिनांक 20.10.2015 अन्वये संबधितावर लावण्यात आलेले गुन्हे गंभिर स्वरूपाचे असून मनपा सेवेत ठेवणे महापालिकेच्या हिताच्या नसल्यामुळे संबधितांना पुन:स्थापीत करता येत नाही असा प्रशासकीय अहवाल नगर सचिव विभागास दिलेला होता. तदनंतर संबधिताने तब्बल 5 वर्ष 6 महिण्यानंतर पुनच्श महानगरपालिका सर्व साधारण सभेकडे अपिल केलेले आहे.

करिता संबधितावर लावलेले गुन्हे हे गंभिर स्वरूपाचे असून त्यांना महानगरपालिका सेवेत पुर्न:स्थापीत करणे मनपाच्या हिताचे नसल्यामुळे त्यांना पुर्नरस्थापीत करता येत नाही.

**विषय क्रं. 14** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागा मधील कार्यरत एकत्रीत वेतनावरील 11 पंप ऑपरेटर हे गेल्या बारा वर्षापासुन कार्यरत आहेत सध्या त्यांना महापालिका रुपये 11,000/- एवढे अत्यल्प वेतन अदा करते त्यामधुन पी.एफ. ची रक्कम वजा करता त्यांना रुपये 9,200/- ऐवढे वेतन प्राप्त होते या महागाईच्या काळात त्यांना त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्यास अडचण निर्माण होत आहे सद्यस्थितीत महापालिका आर. अन्ड बी. इन्फ्रा या कंपनीला रुपये 500/- प्रति दिन प्रति मजुर वेतन अदा करते त्याच धरतीवर सदरील कार्यरत पंप ऑपरेटर यांना रु. 600/- प्रतिदिन प्रती पंप ऑपरेटर असे एकूण प्रती व्यक्ती प्रतिमहा एकत्रीत वेतन रुपये 18,000/- एवढे देण्यात यावे तसेच सदरील पंप ऑपरेटरची मुदत 31 डिसेंबर 2019 रोजी संपल्यामुळे त्यांना मनपा आस्थापनेवरील पंप ऑपरेटरची पदे जसजसे रिक्त होतील अथवा निर्माण होतील त्यांना त्या पंप ऑपरेटरच्या पदावर सेवेत सामावुन घेई पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्यास हि सर्वसाधारण सभा मान्यता प्रदान करते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**सुचक** :- म.मसुद अहेमद खान, आयेशा बेगम शेख असलम **अनुमोदक** :- अ. रशीद अ. गणी, फारुख हुसेन कासीम पिरान

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**